महावितरण

# जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री/तारतंत्र व कोपा या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, महावितरण, महाल विभाग अंतर्गत सन २०२४-२५ करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी प्रशिक्षणाकरिता करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी http://www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता दिनांक ०९.०२.२०२४ (००:०० तासापासुन) ते दिनांक १८.०२.२०२४ (२४:०० तासापर्यंत) आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज करावे. महाल विभागाचा आस्थापना नोंदणी क्रमांक खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभागाचे नाव | आस्थापना नोंदणी क्रमांक | कोपा | वीजतंत्री | तरतंत्री |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाल विभाग | E12202700098 | ७ | १६ | ९ |

(१) शैक्षणिक अर्हता : (१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण. (२) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिशद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री/तारतंत्री व कोपा या व्यवसायात परीक्षा उतीर्ण. (२) शैक्षणिक दस्ताऐवज (१) एस.एस.सी. व आय.टी.आय. वीजतंत्री/तारतंत्री चार सेमिस्टर व कोपा या व्यवसायातील दोन सेमिस्टरची उत्तीर्ण गुणपत्रिकेची मूळप्रत. (२) आधारकार्ड व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंगीक आवश्यक कागदपत्रांची मूळप्रत उमेदवारांने स्वत:च्या प्रोफाईलवर स्कॅन करून अपलोड करावे. (३) विद्यावेतन : प्रचलित नियमाप्रमणे लागू राहिल. (४) वयोमर्यादा : दिनांक ३१.०१.२०२४ पर्यंत १८ ते ३२ वर्ष आवश्यक तसेच मागासवर्गीयांसाठी वयोमर्यादा ०५ वर्ष शिथील राहील. वरील शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवाराची नोंदणी ग्राह्या धरली जाईल. (५) नमुद पद संख्या कमी-अधिक करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारांस कळविला जाणार नाही. (६) भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडून दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल. (७) वरील कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर न केल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही. (८) शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय. गुणांच्या टक्केवारीनुसार (अनुक्रमे ४० व ६० टक्के) अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रवर्गनिहाय निवड केली जाईल. (९) शासन निर्णयानुसार अनुसुचित जाती या प्रवर्गाकरिता १:१० व अनुसुचित जमाती या प्रवर्गाकरिता १:११ या प्रमाणानुसार पदे राखीव व महिलांकरिता शासन निर्णयानुसार पदे राखीव राहतील. (१०) तसेच उमेदवारांनी संकेतस्थळावर ऑनलाईल रजिस्ट्रेशनची नोंदणी केल्याची प्रत (www.apprenticeshipindia.org) व शैक्षणिक अर्हता धारण गुणपत्रिका/ प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रतीसह आपला अर्ज दि. ०९.०२.२०२४ ते दिनांक १८.०२.२०२४ पर्यंत विभागीय कार्यालयास सादर करावे. जे उमेदवार आपले संपूर्ण दस्ताऐवजसह विभागीय कार्यालयास अर्ज सादर करणार नाहीत त्या उमेदवारांची प्रशिक्षणाकरिता निवड करण्याबाबत विचार करण्यात येणार नाही. (११) तसेच नागपूर शहर परिमंडळ अंतर्गत रहिवासी असलेलेच उमेदवाराचे अर्ज ग्राह्य धरण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या महाल विभाग
तुळशीबाग रोड महाल नागपूर-४४००३२